N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी  **P.S.(ठाणे):** गुहागर  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0023  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/02/2019 00:01 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 21/02/2019
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/02/2019
**Time From (वेळेपासून):** 12:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:39 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/02/2019  **Time (वेळ):** 23:36 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 031  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/02/2019 23:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** श्री देव गोपाळकष्ण माध्यमिक व, गुहागर,गुहागर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सौ.गौरी गजानन दिक्षीत
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
**(c) Date/Year of Birth (जन्म** 1961  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रावरचापाट,गुहागर ,गुहागर ,गुहागर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रावरचापाट,गुहागर ,गुहागर ,गुहागर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | .उदय वसंत रावणंगवरीष्ठ लिपीक | | | 1. वरवेली,गुहागर,गुहागर,गुहागर,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजेश महादेव खामकर | | | 1. गुरववाडी ,गुहागर ,गुहागर ,गुहागर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 7,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

यातील वर नमुद दोन्ही आरोपीत यांनी तक्रारदार यांच्या सेवानिवृती नंतरच्या पेन्शनची व अंतिम भविष्य निर्वाह निधीची कागदपत्रे जिल्हापरिषद माध्यमिक शिक्षण विभाग रत्नागिरी कार्यालयातुन मंजुर करुन आणण्यासाठी /- रु लाचेची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम /- रु उदय वसंत रावणंग,वरीष्ठ लिपीक यांनी दि.// रोजी . वाजतश्री देव गोपाळकृष्ण माध्यमिक विदयामंदीर,सदानंद सुदाम पाटील विज्ञान,श्री.महेश जनार्दन भोसले वाणिज्य आणि ,कै.विष्णुपंत पवार कला ज्युनिअर कॉलेज गुहागर कायार्लयात पंचासमक्ष स्विकारली म्हणुन .उदय वसंत रावणंग,वरीष्ठ लिपीक, .राजेश महादेव खामकर,कनिष्ठ लिपीक यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम सुधारणा चे कलम प्रमाणे गुन्हा केल्याने त्यांचेविरुद्ध फिर्याद दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा रजिस्टरी दाखल करण्यात आलेला आहे.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे Dilip Motiram Jadhav **Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): PSMH23554 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर
...हागर पोलीस ठाणे,जि.रत्नागिरी

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Milind Rampratap Hiwale
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPMRHM7001

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -1)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | | 20 |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

फिर्यादी जबाब दिनांक २१/०२/२०१९

मी सौ. गौरी गजानन दिक्षित, वय-५८ वर्षे, व्यवसाय-नोकरी, सहाय्यक शिक्षिका, श्री देव गोपाळकृष्ण माध्यमिक विदयामंदिर, सदानंद सुदाम पाटील विज्ञान, श्री. महेश जनार्दन भोसले वाणिज्य आणि कै. विष्णुपंत पवार कला ज्युनिअर कॉलेज, गुहागर, रा. घर नंबर ३/३०१, वरचापाट, गुहागर ता. गुहागर जि. रत्नागिरी पिन कोड ४१५७०३, मो. नं. ७२१८९७७६९८ फिर्याद लिहून देते की,

मी वरीलप्रमाणे रहाणारी असून, मी गुहागर एज्युकेशन सोसायटीचे श्री देव गोपाळकृष्ण माध्यमिक विदयामंदिर, सदानंद सुदाम पाटील विज्ञान, श्री. महेश जनार्दन भोसले वाणिज्य आणि कै. विष्णुपंत पवार कला ज्युनिअर कॉलेज, गुहागर या शाळेत माध्यमिक विभागामध्ये सहाय्यक शिक्षिका म्हणून काम करीत आहे. आमचे शाळेला महाराष्ट्र राज्य सरकारचे अनुदान मिळते. मी दिनांक २८/०२/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहे. त्यामुळे माझे सेवानिवृत्तीनंतरच्या पेन्शनची व अंतिम भविष्य निर्वाह निधी मंजूरीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे तयार करुन मी गेल्या ८ ते १० दिवसापूर्वी मी आमचे शाळेतील कनिष्ठ लिपिक श्री. खामकर यांचेकडे दिली होती. ती कागदपत्रे त्यांनी आमचे शाळेतील वरिष्ठ लिपिक श्री. रावणंग यांचेकडे दिली. त्यावेळी खामकर व रावणंग यांनी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग रत्नागिरी कार्यालयातून माझी पेन्शन व अंतिम भविष्य निर्वाह निधीची कागदपत्रे मंजूर करुन आणण्यासाठी प्रथम रुपये ३०००/- व सेवानिवृत्त होण्यापूर्वी रुपये ३०००/- असे एकूण रुपये ६०००/-दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैसे कशासाठी दयायचे ? अशी विचारणा केली असता कनिष्ठ लिपिक श्री. खामकर व वरिष्ठ लिपिक श्री. रावणंग यांनी माझे सेवानिवृत्तीनंतरच्या पेन्शनची व अंतिम भविष्य निर्वाह निधी मंजूरीबाबतची कागदपत्रे पूर्ण करणे व ती जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग रत्नागिरी कार्यालयातून मंजूर करुन आणण्यासाठी पैसे दयावे लागतात असे सांगितले.

माझे पती श्री. गजानन दिक्षित हे सुध्दा शिक्षक होते व ते गेल्या सुमारे ८ ते १० वर्षापूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत परंतु त्यांच्या पेन्शनची कागदपत्रे मंजूर करण्यासाठी कुठेही पैसे दयावे लागले नाहीत. त्यानंतर मी इतर कर्मचाऱ्यांकडे सुध्दा चौकशी केली असता त्यांनाही सेवानिवृत्तीनंतरच्या पेन्शनची व अंतिम भविष्य निर्वाह निधीची कागदपत्रे मंजूर करण्यासाठी पैसे दयावे लागले नाहीत असे त्यांचेकडून समजले. त्यावरुन माझी खात्री झाली की, कनिष्ठ लिपिक श्री. खामकर व वरिष्ठ लिपिक श्री. रावणंग हे माझी सेवानिवृत्तीनंतरच्या पेन्शनची व अंतिम भविष्य निर्वाह निधीची कागदपत्रे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग रत्नागिरी कार्यालयातून मंजूर करुन आणण्यासाठी माझेकडे रुपये ६०००/- लाच रक्कमेची मागणी करीत आहेत. त्यांचेशी माझा कोणताही वैरवाद नाही अथवा आर्थिक देवाण घेवाण नाही. कनिष्ठ लिपिक श्री. खामकर व वरिष्ठ लिपिक श्री. रावणंग यांना लाच रक्कम देण्याची माझी अजिबात इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय रत्नागिरी येथे फोनव्दारे संपर्क साधला. त्याअनुषंगाने पोलीस उपअधीक्षक श्री. रानमाळे यांनी आज दिनांक २१/०२/२०१९ रोजी पंचासह गुहागर येथे माझे घरी येवुन माझी समक्ष भेट घेतली व आपली ओळख करुन दिली. पोलीस उपअधीक्षक रानमाळे यांनी त्यांचे सोबत असलेल्या दोन पंचांची व त्यांचे कार्यालयातील स्टाफची मला ओळख करून दिली. त्यावेळी मी पोलीस उपअधीक्षक रानमाळे यांना पंचा समक्ष माझी तक्रार सांगितली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक रानमाळे यांच्या सूचनेप्रमाणे मी त्यांचेकडे सविस्तर तक्रार अर्ज दिला. पंचांनी माझा तक्रार अर्ज वाचुन स्वत:च्या स्वाक्षऱ्या करून त्यावर पोलीस उपअधीक्षक रानमाळे यांनी समक्ष म्हणुन स्वत:ची स्वाक्षरी केली.

समक्ष
21/2/2019
( राजेंद्र रानमाळे )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

गौरी गजानन दीक्षित
21/2/2019
(सौ गौरी गजानन दीक्षित)

त्यानंतर आज दिनांक २१/०२/२०१९ रोजी मला पोलीस उपअधीक्षक रानमाळे यांनी कनिष्ठ लिपिक खामकर व वरिष्ठ लिपिक रावणंग यांची समक्ष भेट घेवुन त्यांनी मागीतलेल्या लाच रक्कमेबाबत बोलणी करणेकरीता डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन त्यांचे स्टाफ मधील महीला पोलीस कर्मचारी सौ. विचारे यांनी माझे अंगावर लपवुन माझे शाळेचे कार्यालयामध्ये पंच सौ. केदार यांचेसह पाठविले असता कनिष्ठ लिपिक खामकर हे कार्यालयात हजर होते. त्यांची मी भेट घेतली. जवळच पंच सौ. केदारी हया उभ्या होत्या. त्यावेळी खामकर यांनी तुम्हाला जायची गरज नाय तिकड, मी आता सर्व करुन आलोय, आता अजिबात काय त्यांना पाठवु नका, फक्त त्यांच काय हाय ना ते फक्त माझ्याकडे दया, मी त्यांना देवुन येतो, एवढच बाकी काय नाय, डायरेक्ट चार दिवसांत जमा होणार, तुम्हाला तिथे जायला नको, देवुन आलो सर्व मी ते कागदपत्र फक्त आता पैशे दयायचे बाकी आहेत असे मला बोलले. त्यावेळी मी किती दयायचे असे बोलले असता खामकर हे रावणंगना विचारा ते सांगतील असे बोलले व मला माझी फाईल दाखवुन तिकडची पोच दाखविली. तसेच माझी एका फॉर्मवर सही घेतली. त्यावेळी मी त्यांना पैसे तुम्ही घेवुन तुम्ही देणार असे त्यांना बोलले असता, त्यांनी देणार त्या माणसाला बरोबर पोच होणार, तुम्ही टेन्शन घेवु नका असे मला बोलले. त्यांचेत बोलणी चालू असताना रावणंग हे कार्यालयात आले. त्यावेळी त्यांनी तीन ठिकाणी पैसे दयायला लागतात, ते त्यांचे रेट ठरलेले असतात असे बोलले त्यावेळी मी किती दयायचे आता असे त्यांना विचारले असता रावणंग हे खामकर यांना तुला किती सांगितलेत त्यांनी असे बोलल्यावर खामकर हे सात हजार सांगितलेत असे बोलले. त्यावर रावणंग हे सात हजार ना असे बोलले. त्यावर मी पैसे कुठे व कधी देवु असे विचारले असता रावणंग यांनी खामकरकडे लगेच दया असे बोलले. त्यावर मी त्यांना म्हणाले की, गेल्यावेळेस मला वाटतं सहा म्हणाले होते. तेव्हा रावणंग व खामकर यांनी त्यावेळी ट्रेझरीचा विषय नव्हता असे बोलुन रावणंग यांनी पे युनिटला तीन हजार रुपये, माध्यमिक शिक्षण अधिका-याकडे तीन हजार रुपये व ट्रेझरीला एक हजार रुपये असे दया.

त्यानंतर मी पंचासह माझे घरी परत आल्यावर पोलीस उप अधीक्षक रानमाळे यांनी माझे अंगावर लपविलेला डीजीटल व्हाईस रेकॉर्डर महीला पोलीस कर्मचारी सौ. विचारे यांचेकरवी ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर त्यांना मी वरीलप्रमाणे घडलेली हकीगत सांगितल्यावर त्यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यातील संभाषण ऐकले. त्यामध्ये कनिष्ठ लिपिक खामकर व वरिष्ठ लिपिक रावणंग यांनी माझ्या सेवानिवृत्तीनंतरच्या पेन्शनची व अंतिम भविष्य निर्वाह निधीची कागदपत्रे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग रत्नागिरी कार्यालयातून मंजूर करुन आणण्यासाठी माझेकडे ७०००/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे स्पष्ट झाले व लाचेची रक्कम रावणंग यांनी लगेच आणुन देण्यास सांगितले त्यावरुन पोलीस उपअधीक्षक रानमाळे यांनी लागलीच सापळा आयोजित करणार असल्याचे मला व पंचाना सांगितले.

पोलीस उप अधीक्षक रानमाळे यांचे सुचनेवरुन मी माझे बचतीमधील रक्कम ७,०००/- रुपये (त्यामध्ये २०००/- रुपये दराच्या ०२ व ५००/- रुपये दराच्या ०६ नोटा) लाच म्हणुन देण्यासाठी हजर केली. सदरची रक्कमेचे नंबर एका कागदावर लिहुन काढण्यात आले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक रानमाळे यांनी मला व पंचाना ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक रानमाळे यांचे सुचनेवरुन स्टाफ मधील पोलीस हवालदार ओगले यांनी मी हजर केलेल्या नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावून, त्या नोटांची घडी करुन ती रक्कम माझ्याकडील पिशवीचे आतील कप्प्यात ठेवली. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक रानमाळे यांनी मला लोकसेवक खामकर किंवा

समक्ष
[signature] २१/२/२०१९
( राजेंद्र रानमाळे )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

[signature]
२१/२/२०१९
( सौ गौरी गजानन दिक्षित )

रावणंग हे जोपर्यंत लाचेची रक्कम मागत नाही तोपर्यंत त्या नोटांना हात न लावण्याची सूचना दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक रानमाळे यांच्या सूचनेवरुन मी व पंच सौ. केदार असे लोकसेवक खामकर व रावणंग यांना भेटण्यासाठी माझे शाळेमध्ये निघालो. आमचे मागोमाग पोलीस उप अधीक्षक रानमाळे, पंच नं २ चव्हाण, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी येऊन त्यांनी माझी शाळा श्री देव गोपाळकृष्ण माध्यमिक विदयामंदिर, सदानंद सुदाम पाटील विज्ञान, श्री. महेश जनार्दन भोसले वाणिज्य आणि कै. विष्णुपंत पवार कला ज्युनिअर कॉलेज, गुहागरचे परिसरात सापळा लावला. मी द पंच सौ. केदार असे माझे शाळेच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी कार्यालयात वरिष्ठ लिपिक रावणंग हे हजर होते. जवळच पंच सौ. केदार या उभ्या राहील्या होत्या. त्यावेळी मला पाहुन रावणंग हे खामकर लग्नाला गेलाय असे मला म्हणाले. म्हणुन मी तुम्ही आहात ना असे त्यांना म्हणाले असता त्यांनी मला बसण्यास सांगीतले. मी रावणंग यांना मगाशी सांगीतल्याप्रमाणे आणलेत असे बोलले असता किती आणलेत असे रावणंग मला बोलले. त्यावेळी सात हजार आणलेत असे मी त्यांना बोलले व माझेकडील पिशवीमध्ये असलेली ७०००/- रुपये लाचेची रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढुन ती रावणंग यांचे समोर धरली असता, ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारली. त्यावेळी मी त्यांना मोजुन घ्या असे बोलले असता, त्यांनी ती आपल्या दोन्ही हातांनी मोजुन आपल्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली व सात आहेत असे मला बोलले. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केल्यावर लागलीच सापळा पथकाने उदय वसंत रावणंग, वरिष्ठ लिपीक यांना दि. २१/०२/२०१९ रोजी १३.३९ वाजता ताब्यात घेतले.

उदय वसंत रावणंग यांना ताब्यात घेतल्यानंतर पोलीस उप अधीक्षक रानमाळे यांनी त्यांना कनिष्ठ लिपिक खामकर कोठे आहेत अशी विचारणा केली असता, त्यांनी लग्नाला गेले आहेत असे सांगीतले. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक रानमाळे यांनी रावणंग यांचेकडे चौकशी करता त्यांनी खामकर हे दत्तमंदीर कार्यालय येथे लग्नाला गेल्याचे सांगितले त्यानुसार पोउपअधीक्षक रानमाळे यांचे सुचनेनुसार पोलीस निरीक्षक कदम यांनी तेथे जावुन राजेश महादेव खामकर, कनिष्ठ लिपीक यांना ताब्यात घेवुन आमचे शाळेतील कार्यालयामध्ये आणले.

तरी १) श्री. उदय वसंत रावणंग, वरिष्ठ लिपिक, २) श्री. राजेश महादेव खामकर, कनिष्ठ लिपीक दोन्ही श्री देव गोपाळकृष्ण माध्यमिक विदयामंदिर, सदानंद सुदाम पाटील विज्ञान, श्री. महेश जनार्दन भोसले वाणिज्य आणि कै. विष्णुपंत पवार कला ज्युनिअर कॉलेज, गुहागर यांनी माझ्या सेवानिवृत्तीनंतरच्या पेन्शनची व अंतिम भविष्य निर्वाह निधीची कागदपत्रे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग, रत्नागिरी कार्यालयातुन मंजुर करुन आणण्यासाठी ७,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, मागणी केलेली लाच रक्कम ७,०००/- रुपये उदय वसंत रावणंग, वरिष्ठ लिपिक यांनी दिनांक २१/०२/२०१९ रोजी १३.३९ वाजता श्री देव गोपाळकृष्ण माध्यमिक विदयामंदिर, सदानंद सुदाम पाटील विज्ञान, श्री. महेश जनार्दन भोसले वाणिज्य आणि कै. विष्णुपंत पवार कला ज्युनिअर कॉलेज, गुहागरचे कार्यालयात पंचासमक्ष स्विकारली. म्हणून माझी १) श्री. उदय वसंत रावणंग, वरिष्ठ लिपिक, २) श्री. राजेश महादेव खामकर, कनिष्ठ लिपीक यांचेविरुध्द फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

हे लिहुन दिले

गौ.गौ.गजानन दिक्षित
२१/२/२०१९
(सौ गौरी गजानन दिक्षित)

समक्ष
२१/२/२०१९
( राजेंद्र रानमाळे )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी